दि. २६/०५/२०२३

म. टा. पा. न. 9

# 'ठाकरे-पवार यांचा 'समृद्धी महामार्गा'ला विरोध होता'

म. टा. प्रतिनिधी, नगर

## उद्घाटनावेळी फडणवीसांचा आरोप

'आमच्या सरकारच्या काळातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या समृद्धी महामार्गाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे तसेच राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी विरोध केला होता. ठाकरे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये सभा घेऊन, तर पवार यांनी नगरमधील बैठकीत विरोधाची भूमिका घेतली,' असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केला. 'मात्र, ज्या गावात त्यांनी एक इंचही जमीन देणार नाही असे सांगत विरोधात सभा घेतल्या, त्याच गावातून पहिले भूसंपादन झाले,' असेही फडणवीस म्हणाले.

नागपूर ते मुंबई हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व फडणवीस यांच्या हस्ते कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथे झाले. शिर्डी ते नाशिक जिल्ह्यातील भरवीरपर्यंतचा टप्पा आता वाहतुकीस (पान ७वर)

## ठाकरे-पवारांचा 'समृद्धी'ला विरोध

(पान एकवरून) खुला झाला आहे. 'आगामी ६ ते ८ महिन्यांत संपूर्ण काम पूर्ण होईल. तिसऱ्या टप्प्याचे उद्घाटन झाल्यावर मुंबईपर्यंतचा रस्ता खुला होईल. अनेकांना हे स्वप्न आणि फक्त घोषणा वाटायची. मात्र, मला आणि एकनाथ शिंदे यांना हे काम वेळेत पूर्ण होणार असा विश्वास होता,' असे फडणवीस म्हणाले.

'या महामार्गाचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. अनेक अडचणीतून मार्ग काढत पंतप्रधानांच्या सहकार्याने हे काम होत आहे. मागील सरकारमध्ये फडणवीस मुख्यमंत्री असताना मी नगरविकास मंत्री होतो. माझ्याकडे काही काम नव्हते. तेव्हा फडणवीस मला म्हणाले, तुम्हाला असे काम देतो की दुसरे काही करण्याची गरज पडणार नाही. तेव्हा माझ्याकडे समृद्धी महामार्गाचे काम देण्यात आले,' असेही शिंदे म्हणाले.

**'मुझे रास्ते बनाने का शौक'**

'अंदाज कुछ अलग ही हैं मेरे सोचने का, सबको मंजिलो का शौक हैं और मुझे रास्ते बनाने का...' फडणवीस यांच्या या शायरीला उपस्थितांच्या टाळ्या मिळाल्या खऱ्या; मात्र आता त्याचे वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत. फडणवीस यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडील रस्ते वाहतूक खात्याची तर अपेक्षा नाही ना, अशी चर्चा सुरू झाली.

म. टा. पु. पा. नं. 9

## भाजपच्या प्रभारीपदी ठाकूर

**मिरा-भाईंदर :** ठाणे जिल्ह्याच्या भाजप प्रभारी पदाची जबाबदारी जयप्रकाश ठाकूर यांच्यावर देण्यात आल्याचे पत्रक भाजप प्रदेश कार्यालयाकडून जारी करण्यात आले. राज्यभरातील आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा प्रभारींची नवी यादी नुकतीच जारी केली आहे. यात ठाणे शहर, ग्रामीण व मिरा-भाईंदरच्या प्रभारी पदी भाजपचे उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी पाहणाऱ्या जयप्रकाश ठाकूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

म. टा. पु. पा. न. 9

# कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी भाजपचा मोर्चा

म. टा. वृत्तसेवा, वसई



## वसई-विरारच्या कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची मागणी

वसई-विरार महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी भाजप कामगार आघाडीने शुक्रवारी पालिका कार्यालयावर मोर्चा काढला. 'समान वेतन, समान काम' या प्रमुख मागणीसाठी विरार पूर्वेतील आर. जे. नाका ते पालिका कार्यालयापर्यंत काढलेल्या या मोर्चात एक हजाराच्या आसपास आंदोलनकर्ते सहभागी झाले होते.

भाजप कामगार आघाडीचे राज्य उपाध्यक्ष विजय मांडवकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. वसई-विरार महापालिकेत अनेक कामगार कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत, तर काही कामगार कायमस्वरूपी आहेत. महापालिका कंत्राटदारांची घरे भरते, मात्र कामगारांना राबवून घेते, असा आरोप करत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आल्याचे भाजपच्या नीलेश राणे यांनी सांगितले. वसई-विरार महापालिकेने कामगारांना कायमस्वरूपी करावे, कामगारांना सरकारी जागेवर घरे मिळावीत, १५ वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावलेल्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घ्यावे, कर्मचाऱ्यांना गणवेश, शूज, हातमोजे, पावसाळी गणवेश तसेच सेफ्टी किट देण्यात यावे, पगाराच्या पावत्या मिळाव्यात, पीएफ, ग्रॅच्युइटी द्यावी, आदी मागण्या करण्यात आल्या. याबाबतचे निवेदन पालिकेचे अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे यांना देण्यात आले.

CamScanner

दि 26/05/2023

म.टा.पु.पा.न. १

# वालीव येथे तरुणाची हत्या

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वालीव येथे राहणाऱ्या एका तरुणाची कात्रीने वार करून हत्या करण्यात आल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. या तरुणाच्या कार्यालयात काम करणाऱ्या एका महिलेला शिवीगाळ करत तिच्याशी वाद घालत असल्याने महिलेच्या दोन सहकाऱ्यांनी ही हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले.

अंकित शहा (२१) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव असून तो वसई पूर्व चाचरळपाडा येथे एका बांधकाम व्यावसायिकाच्या कार्यालयात काम करत होता. त्याच ठिकाणी एक तरुणी आणि संशयित आरोपी असलेले इमामुद्दीन मन्सुरी आणि नईम मन्सुरी हे दोन तरुण काम करत होते. अंकित हा या तरुणीला त्रास देत तिच्याशी वाद घालत असे, तसेच तिला शिवीगाळ करत असे. या रागातून ही हत्या झाल्याचा पोलिसांना संशय आहे. गुरुवारी रात्री इमामुद्दीन मन्सुरी आणि नईम मन्सुरी यांच्याकडे असलेल्या कात्रीने अंकित शहा याच्या छातीवर, दंडावर आणि पाठीत वार करून त्याची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी वालीव पोलिसांनी इमामुद्दीन मन्सुरी आणि नईम मन्सुरी यांच्यावर गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

म.टा.पु.पा.नं. १

# पोलिस अधिकाऱ्याला तुळींजमध्ये धक्काबुक्की

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

चौकशीसाठी पोलिस ठाण्यात आणलेल्या एका व्यक्तीने चक्क पोलिस ठाण्यातच वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना धक्काबुक्की करत, त्यांच्या गणवेशाच्या शर्टची बटने व खांद्यावरील ताऱ्यांची पट्टी तोडल्याची घटना गुरुवारी दुपारी तुळींज पोलिस ठाण्यात घडली. या प्रकरणी तुळींज पो. ठाण्यात गुन्हा दाखल करून संबंधिताला अटक करण्यात आली.

नालासोपारा येथील राहणाऱ्या शशिकांत बालाजी गुजराती याला वॉरंट बजावण्यासाठी तुळींज पोलिस त्याच्या घरी गेले होते. त्यावेळी त्याने साहाय्यक पोलिस उपनिरीक्षकांना शिविगाळ करून त्यांच्यासोबत उद्धट वर्तन केले. त्यामुळे पोलिसांनी त्याला तुळींज पोलिस ठाण्यात चौकशीसाठी नेले आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्यासमोर उभे केले. त्यावेळी गुजराती याने साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक हिरालाल तडवी आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्याशी वाद घातला. त्यानंतर सरकारी गणवेशाच्या शर्टची बटणे व खांद्यावरील ताऱ्यांची पट्टी तोडून त्याचे नुकसान केले.

म.टा.पु.पा.न. १

## मनसेकडून नियुक्ती

**मिरा-भाईंदर :** मनसेच्या ओवळा माजीवडा विधानसभा क्षेत्राच्या अध्यक्षपदी सचिन पोपळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, पक्ष बळकट करण्यासाठी त्यांच्यावर ही जबाबदारी देण्यात आल्याचे सांगितले जाते. पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवारी त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. ही जबाबदारी पूर्वी विक्रम कृपाळ यांच्यावर होती.

लोकमत पा.नं. १

# संसद उद्घाटनविरोधी याचिका कोर्टाने फेटाळली

## सुनावणीला नकार : कलम ७९ व समारंभाचा संबंध काय?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या नवीन इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यासाठी लोकसभा सचिवालयाला निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नकार दिला. ही याचिका का, कशी दाखल करण्यात आली हे न्यायालयाला समजते. यात लक्ष घालणे, हे न्यायालयाचे काम नाही.

आम्ही तुम्हाला दंड ठोठावत नाही, त्याबद्दल तुम्ही आभार मानायला हवे, अशा शब्दांमध्ये न्यायालयाने याचिकाकर्त्यांना खडेबोल सुनावले. घटनेच्या कलम ३२ अंतर्गत न्यायालयाला या याचिकेवर सुनावणी करायची नाही, असे न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी व न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. त्यामुळे आता उद्घाटनात कोणताही अडथळा राहिलेला नाही.



### राष्ट्रपतींच्या हस्ते करण्याची मागणी

वकील जय सुकीन यांनी ही याचिका दाखल केली होती. ते म्हणाले की, राष्ट्रपतींना उद्घाटनासाठी आमंत्रित न करून त्यांचा "अपमान" करत आहेत. घटनेच्या कलम ७९ नुसार राष्ट्रपती हे देशाच्या कार्यकारी मंडळाचे प्रमुख आहेत, त्यामुळे त्यांना निमंत्रित करायला हवे होते.

### भवनाच्या उभारणीत महाराष्ट्राचा वाटा

- नव्या संसद भवनात देशातील सांस्कृतिक वैविध्यतेचे दर्शन घडणार आहे. भवनातील फर्निचर मुंबईत तयार करण्यात आले आहे. इमारतीसाठी वापरण्यात आलेले सागवान नागपुरातून मागविण्यात आले आहे.
- तसेच अशोक स्तंभ बनविण्यासाठी आवश्यक साहित्य छत्रपती संभाजीनगर येथून मागविण्यात आले आहे.
- सजावटीसाठी कार्पेट उत्तर प्रदेशच्या मिर्झापूर येथून तर बांबूचे फ्लोअरिंग त्रिपुरा आणि विविध प्रकारचे खडक राजस्थानातून मागविण्यात आले आहे.

**संत आणि पुरोहित राजधानीत दाखल :** नव्या संसद भवनाच्या उद्घाटन समारोहादरम्यान पूजा आणि हवन करण्यात येणार आहे. हे शुभकार्य करण्यासाठी तामिळनाडुतील विविध मठांचे संत व पुरोहित नवी दिल्लीत दाखल झाले. त्यांचे आर. के. पुरम येथील मंदिरात स्वागत करण्यात आले.

दि. २६/०५/२०२३

लोकसत्ता पा. नं. ११

# कारवाई टाळणे हा न्यायालयाचा अवमान

## मशिदींवरील ध्वनिक्षेपकांवरून उच्च न्यायालयाने पोलिसांना पुन्हा फटकारले

लोकसत्ता प्रतिनिधी

**प्रकरण काय?** याचिकाकर्तीच्या म्हणण्यानुसार मशिदींवरील भोंग्यामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाविरोधात समता नगर पोलीस ठाण्यात अनेकदा तक्रारी केल्या. मशिदीमध्ये पहाटे अजान देण्यासाठी ध्वनिक्षेपकाचा वापर केला जातो, हे दाखवणाऱ्या चित्रफितीही त्यांनी समाजमाध्यमांवरून प्रसिद्ध केल्या होत्या. मशिदीच्या जवळच ईएसआयएस हे रुग्णालय असल्याचेही त्यांनी याचिकेत म्हटले आहे. याआधी त्यांनी २०१७ रोजीही ध्वनिप्रदूषणाविरोधात याचिका केली होती. २०१८ मध्ये रिचर्ड यांच्या अवमान याचिकेमुळे मशिदीवरील ध्वनिक्षेपक काढून टाकण्यात आले होते, मात्र या ध्वनिक्षेपकाचा गोंगाट पुन्हा सुरू झाल्यामुळे रिचर्ड यांनी पुन्हा मे २०२२ मध्ये न्यायालयात धाव घेतली होती.



**मुंबई :** मशिदींवरील ध्वनिक्षेपकांद्वारे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या तक्रारींवर पोलिसांकडून कारवाई न होणे हा न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असल्याचे आहे, असे उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. तसेच तक्रारींकडे कानाडोळा करणाऱ्या पोलिसांच्या कारभारावरही नाराजी व्यक्त केली.

कांदिवली पूर्व येथील ठाकूर गाव परिसरातील मशिदींवरील ध्वनिक्षेपकांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या त्रासाची वारंवार तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलिसांविरोधात वकील रीना रिचर्ड यांनी केलेल्या याचिकेची उच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात दखल घेतली होती. तसेच रात्रीच्या वेळी ध्वनिक्षेपकाचा वापर केला जाणार नाही याची खात्री करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने पोलिसांना दिले होते. याबाबतच्या कायद्याचे पालन न केल्यास अवमान कारवाई करू, असा इशाराही न्यायालयाने पोलिसांना दिला होता. शिवाय याचिकाकर्तीने केलेल्या तक्रारींवर कारवाई करण्याचेही न्यायालयाने बजावले होते. या आदेशांनंतर दोन वेळा तक्रार करूनही पोलिसांकडून काहीच कारवाई केली गेली नाही. त्यामुळे याचिकाकर्तीने पुन्हा एकदा सुट्टीकालीन न्यायालयात धाव घेऊन पोलिसांच्या निष्क्रियतेचा मुद्दा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला.

न्यायमूर्ती अभय अहुजा आणि न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी ८ आणि १४ मे रोजी ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यात केली. मात्र पोलिसांकडून त्यावर काहीच कारवाई करण्यात आली नाही, असे याचिकाकर्तीने न्यायालयाला सांगितले. तसेच आपल्या तक्रारींवर कारवाई करण्याची मागणी याचिकाकर्तीने केली. या प्रकरणी दाखल जनहित याचिकेवर न्यायालयाने दिलेल्या आदेशांबाबतही याचिकाकर्तीने न्यायालयाला माहिती दिली. त्याची दखल घेऊन न्यायालयाने पोलिसांच्या कारभारावर नाराजी व्यक्त केली. तसेच मशिदींवरील ध्वनिक्षेपकांद्वारे ध्वनिप्रदूषणाच्या तक्रारींवर पोलिसांकडून कारवाई न होणे हा न्यायालयाच्या आदेशांचा अवमानच आहे, असे स्पष्ट केले. त्याच वेळी याचिकाकर्तीने केलेल्या तक्रारींवरील कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

लोकसत्ता पा. न. ५

# निकालापूर्वीच बारावीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या

**वसई :** बारावीचा निकाल लागण्याच्या काही तास आधीच एका विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. हिमांशू पाटील (१९) असे या विद्यार्थ्याचे नाव आहे. एव्हरशाईन सिटी येथील पाटील वाडीत राहणारा हिमांशू विद्यावर्धिनी महाविद्यालयात बारावी संगणक विज्ञान शाखेत होता. गुरुवारी दुपारी बारावीचा निकाल लागला. मात्र त्यापूर्वी पहाटे ६ वाजता त्याने घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. विशेष म्हणजे त्याला बारावीच्या परीक्षेत ६० टक्के गुण मिळाले. निकालाच्या भीतीने त्याने आत्महत्या केल्याची शक्यता वालीव पोलिसांनी व्यक्त केली आहे.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# मोबाइल चोरटे गजाआड

**वसई :** दुचाकीवरून मोबाइल हिसकावणाऱ्या दोन आरोपींना पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली आहे. आरोपींनी चार गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

वसई फाटा येथून दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी प्रवाशाच्या हातून मोबाइल लंपास केल्याची घटना नुकतीच घडली होती. याप्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास करून दोन जणांना भिवंडी येथून अटक केली आहे. मोहम्मद सलीम अन्सारी (वय २१), मोहम्मद वारीस अली (वय २०) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे असून त्यांच्याकडून दुचाकी व मोबाइल हस्तगत करण्यात आला आहे.

CamScanner

दि. २८/०५/२०२३

लोकसत्ता पु. पा. न. ४

# विरारमध्ये अज्ञातांकडून चार रिक्षांची तोडफोड

## तक्रारीअभावी गुन्हा नाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** भर रस्त्यात रिक्षा उभ्या करणाऱ्या रिक्षाचालकांना संतप्त नागरिकांनी अद्दल घडवली. शुक्रवारी सकाळी विरार पश्चिमेच्या गावठाण परिसरातील चार रिक्षा अज्ञात व्यक्तींनी फोडल्याने एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर विरार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परंतु, कुणीच तक्रार दिली नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

विरार गावठाण परिसर हा रेल्वे स्थानकाला लागून आहे. तेथे गेल्या काही दिवसांपासून रिक्षाचालक प्रवासी घेण्यासाठी रिक्षा उभी करत आहेत. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन पादचाऱ्यांना ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे. 'या गावठाणात रिक्षा उभी करू नका,' असे स्थानिकांनी रिक्षाचालकांना सांगितले होते. मात्र स्थानिकांना न जुमानता रिक्षा उभ्या केल्या जात होता. त्यामुळे शुक्रवारी सकाळी स्थानिकांचा उद्रेक झाला. सकाळी १० च्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी या परिसरार असलेल्या चार रिक्षांच्या काचा तोडून रिक्षाची नासधूस केली. यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.

या प्रकाराची माहिती मिळताच विरार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. मात्र एकही रिक्षाचालक तक्रार देण्यासाठी पुढे आला नाही. या घटनेत एकूण चार रिक्षांचे नुकसान झाले आहे. मात्र कुणीही तक्रार न दिल्याने गुन्हा दाखल केलेला नाही, अशी माहिती विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली.

पुढारी पा. न. ३

# जबरी चोरी करणाऱ्या दोघांना अटक

**मिरारोड :** पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या दोघांना पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करून ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दत्तात्रय जगन्नाथ बेलोसे (४३) हे त्यांच्या मोटर सायकलवरून गुजरातच्या दिशेने जात असताना सायली पेट्रोल पंपाजवळ, वसई फाटा येथे दोन अनोळखी इसमांनी मोटर सायकलवर येवून बेलोसे यांच्या खिशात असलेला मोबाईल फोन जबरीने हिसकावून घेवून पळून गेले. त्याबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात आरोपी व गुन्हयात वापरण्यात आलेल्या मोटर सायकलचा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून मोहम्मद सलीम अन्सारी (२१) व मोहम्मद वारीस अली खान (२०) दोन्ही रा. अंजुर फाटा, भिवंडी यांना या गुन्ह्यात २४ तासाचे आत अटक केली. त्यांच्याकडून गुन्हयात वापरण्यात आलेली मोटर सायकल व मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी हे पोलीस कोठडीत असून गुन्ह्याचा पुढील तपास पोउनि सनिल पाटील हे करत आहे. तपासामध्ये या आरोपींनी पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत चार गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे.

पुढारी पा. न. १

# 'मविआ' म्हणजे अलिबाबा, चाळीस चोर!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ते मोदींना हरवू शकत नाहीत



**नगर : पुढारी वृत्तसेवा**

मागचे सरकार भ्रष्टाचाऱ्यांचे सरकार होते. त्यांचे मंत्री जेलमध्ये चाललेत. जनहिताचा विचार कोणी करत नव्हते, मुख्यमंत्री घरात होते आणि मंत्री मनमानी कारभार करत होते. म्हणून शिंदे यांच्याबरोबर आपण युतीचे सरकार केले. आता हे अलिबाबा चाळीस चोर कितीही एकत्र आले, तरी ते पंतप्रधान मोदी यांना हरवू शकत नाहीत, अशी घणाघाती टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी महाविकास आघाडीवर केली.

भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आमदार राम शिंदे, खासदार डॉ. सुजय विखे-पाटील यांच्यासह जिल्ह्यातील भाजप आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

महाविकास आघाडीचा उल्लेख महावसुली आघाडी असा करत फडणवीस यांनी जोरदार टीका केली. ते म्हणाले, ते कितीही एकत्र आले, तरी मोदींना हरवू शकत नाहीत. ममता बॅनर्जी नगरला

/...६

# 'मविआ' म्हणजे अलिबाबा चाळीस चोर

(पान १ वरून) आल्या किंवा शरद पवार मणीपूरला गेले, तर त्यांना पाहायला किंवा ऐकायला कोण जाईल? मात्र पंतप्रधान मोदी कुठेही गेले, तरी त्यांना पाहायला, ऐकायला लाखोंची गर्दी होते. तुमचा एक नेता कोण एवढे जरी हे ठरवू शकले, तरी एक वेळ लोक यांना मते देतील; पण हे एकत्र राहूच शकत नाहीत. फक्त सत्ताच त्यांना एकत्र आणू शकते. सत्ता आणि पैसा यांना एकत्र आणणारे चुंबक आहे. हे चुंबकच मोदींनी काढून घेतले आहे, असे फडणवीस म्हणाले.

युती सरकारने गेल्या दहा महिन्यांमध्ये राबविलेल्या विविध योजनांची माहिती देऊन या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम भाजपच्या कार्यकर्त्यांनी करणे गरजेचे आहे, असे आवाहन करून फडणवीस म्हणाले, भाजप कार्यकर्ता सरकार आणि जनतेतील सेतू झाला पाहिजे. कार्यकर्त्यांकडे पुढील एक वर्ष मी पक्षासाठी नव्हे, तर देशासाठी मागतो आहे. हे एक वर्ष भारतासाठी, पुढच्या पिढ्यांसाठी आहेत. छोट्या छोट्या गोष्टींवर नाराज न होता, मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे हे एकच ध्येय आहे. राज्यातील लोकसभेच्या ४२ पेक्षा जास्त जागा मिळवायच्या आहेत. 'देव, देश अन् धर्मासाठी सर्वस्व द्यायचंय', असे आवाहन त्यांनी केले.

सर्वप्रथम आमदार राम शिंदे यांचे भाषण झाले. ते म्हणाले, भाजपमध्ये संवाद आहेच. पण सुसंवाद राहिला पाहिजे, म्हणून फडणवीस इथे आले आहेत. सध्या सत्तेत पक्षाचे जिल्ह्यातील केवळ दोन आमदार आहेत. ही संख्या वाढवण्यासाठी आपल्याला झोकून देऊन काम करायचे आहे आणि नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करायचे आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी 'जाणता राजा अस्तित्वाच्या शोधात आहे', अशी टीका करून आघाड्या कितीही झाल्या, तरी भाजपचा पराभव करण्याची ताकद कोणातही नाही, असे सांगितले.

CamScanner

दि. २६/०५/२०२३

पुढारी पु. पा. नं. २

# कामगारांनी पालिका मुख्यालयात उधळल्या नोटा

## सफाई कामगारांवर कारवाई केल्याचा राग

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सार्वजनिक शौचालयांच्या देखभाल, दुरुस्तीसाठी काढलेल्या नवीन निविदेप्रमाणे शौचालयांची साफसफाई योग्यप्रकारे न करणाऱ्या ४१ सफाई कामगारांना शौचालयावर बांधण्यात आलेल्या घराबाहेर काढण्याची कारवाई शुक्रवारी प्रशासनाकडून करण्यात आली. त्यावर संतापलेल्या कामगारांनी पालिका मुख्यालयात धाव घेत त्याच्या प्रवेशद्वाराबाहेर चलनी नोटा उधळून पालिकेच्या कारवाईचा निषेध केला.

पालिकेने शहर हगणदारी मुक्त करण्याच्या उद्देशाने ठिकठिकाणी सुमारे १४५ सार्वजनिक शौचालये बांधली. सुरुवातीला या शौचालयांची देखभाल, दुरुस्ती करण्याचा ठेका तीन वेगवेगळ्या संस्थांना देण्यात आला आहे. ठेकेदाराकडून नवीन निविदेतील अटीशर्तीप्रमाणे कामगारांना प्रती सीट (कमोड) मागे ठराविक रक्कम देणे अपेक्षित आहे. मात्र ठेकेदार या सफाई कामगारांना महिन्याचे वेतन देत त्यांना पालिकेने शौचालयावर बांधलेल्या घरामध्ये मोफत राहण्याची व्यवस्था करून देत असल्याचे सांगण्यात आले. हे कामगार नियमित शौचालयांची साफसफाई करीत त्यातील मुतारीखेरीज शौचालयाचा वापर करणाऱ्यांकडून ५ रुपये शुल्क वसूल करतात. या शुल्क वसुलीसह महिन्याला ठेकेदाराकडून मिळणाऱ्या वेतनातून त्यांचा उदरनिर्वाह चालतो. मात्र काही कामगार शौचालयांची साफसफाई योग्यप्रकारे करीत नसल्याच्या अनेक तक्रारी पालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या. त्याची दखल घेत आयुक्त दिलीप ढोले यांनी गुरुवारी संबंधित ठेकेदारांसह पालिकेचे स्वच्छता निरीक्षक व अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून जे सफाई कामगार शौचालयांची साफसफाई योग्यप्रकारे करीत नाहीत त्या कामगारांवर कारवाई करून त्यांना तेथून काढण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार पालिकेने सुमारे १४५ पैकी ४१ सार्वजनिक शौचालयांमध्ये साफसफाईचे काम योग्यप्रकारे करणाऱ्या तसेच दादागिरी करून त्या शौचालयावरील घरांमध्ये मोफत वास्तव्य करणाऱ्या कामगारांना तेथून बाहेर काढण्याची कारवाई केली. यावर संतापलेल्या कामगारांनी थेट पालिका मुख्यालयात धाव घेत चलनी नोटा उधळून कारवाईचा निषेध केला.

पुढारी पु. पा. नं. १

## वसईत तरुणाची हत्या

**नालासोपारा :** सोबत काम करणाऱ्या महिलेला दमदाटी करून, शिवीगाळ केल्याच्या रागातून, दोघा बापलेकांनी एका २१ वर्षीय तरुणाची कैचीने वार करून निर्घृणपणे वसईत हत्या केली आहे. याबाबत भादंवि कलम ३०२, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून, दोन आरोपींना अटक केले आहे. अंकित रामप्रकाश शहा ( वय २१) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव तर इमामुद्दीन मोहम्मद रफिक मन्सूरी, नईम इमामुद्दीन मन्सूर असे हत्या करणाऱ्या बाप लेकाचे नाव आहेत. आरोपी आणि मयत हे तिघेही वसई पूर्व वाघराळपाडा येथील राहणारे आहेत. वाघराळपाडा येथील विशाल उपाध्याय चाळीकडे जाणाऱ्या येणाऱ्या रस्त्याच्या कडील पिंपळाच्या झाडा जवळ काल गुरुवार ता २५ रोजी रात्री साडे अकरा वाजता महिलेला शिवागळ केल्याच्या कारणावरून पहिल्यांदा वादविवाद सुरू झाला. याच वादावादित चक्क आरोपीनी मयताच्या छातीवर, दंडावर, पाठीवर जवळ असणाऱ्या कैची ने सपासप वार करून त्याची हत्या केली आहे. याप्रकरणी वाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पुण्य नगरी पु. पा. नं. १

# मीरा रोडमध्ये हुक्का पार्लरवर पोलिसांची कारवाई

**मीरा रोड :** मीरा रोड पोलीस ठाणे हद्दीत डिव्हाईन हुक्का पार्लरमध्ये अवैधरित्या तंबाखूमिश्रीत हुक्का ग्राहकांना ओढण्यासाठी देत असल्यामुळे पोलिसांनी हुक्का पार्लरवर कारवाई केली.

मीरा-भाईंदर शहरात गेल्या अनेक दिवसांपासून अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला आहे. अवैध गुटखा, अमली पदार्थ, हुक्का पार्लर, पहाटे उशिरापर्यंत बार सुरू असल्याचे सांगितले जाते.पोलीस कारवाई करत असले तरी यामध्ये वाढ होताना दिसत आहे. मीरा रोड पोलीस ठाणे हद्दीत बेव्हलपार्क येथे डिव्हाईन हुक्का पार्लरमध्ये अवैधरित्या तंबाखू मिश्रीत हुक्का ग्राहकांना ओढण्यासाठी उपलब्ध करून देत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सपोनि. सोनवलकर यांनी पथकासह डिव्हाईन हुक्का पार्लर येथे छापा टाकला असता, हुक्का पार्लरमध्ये काही ग्राहक हुक्का पित असल्याचे दिसून आले. त्या वेळी चालक दीपक शिवराजराव मालचापूर (२०) व रमजान हबीब शेख (१९) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. हुक्का पार्लरमध्ये पार्लरचे मॅनेजर दीपक शिवराजराव मालचापूर याने सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या ग्राहकांना तंबाखुयुक्त हुक्का ओढण्यासाठी उपलब्ध करून दिला. तसेच ग्राहकांच्या समोर टेबलावर हुक्क्याचे पात्र त्यावर जळता कोळसा ठेवून मानवी जीवन धोक्यात येईल, असे कृत्य केले तसेच ग्राहक हे या ठिकाणी प्रतिबंधित तंबाखुजन्य हुक्का पित असताना मुद्देमालासह मिळून आले.

CamScanner

दि. २८/०५/२०२३

सकाळ पा. न. ५

# गौतमी पाटीलचा कार्यक्रम आयोजकांना पडला महागात

## अटी-शर्तींचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

नालासोपारा, ता. २६ (बातमीदार) : प्रसिद्ध नृत्यांगणा गौतमी पाटीलचा कार्यक्रम ठेवणे आयोजकांना चांगलेच महागात पडले आहे. परवानगीच्या अटी-शर्तींचा भंग केल्याप्रकरणी आयोजक प्रभाकर पाटील यांच्यावर विरारच्या मांडवी पोलिस ठाण्यात शुक्रवारी (ता. २६) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विरारच्या खार्डी गावचे प्रभाकर पाटील यांनी घरच्या सत्यनारायणाच्या पूजेनिमित्त गुरुवारी आपल्या घराच्या समोरील मैदानात गौतमी पाटील हिच्या नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाची प्रभाकर पाटील यांनी रितसर परवानगीही घेतली होती. रात्री ७ ते १० वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालणार होता; मात्र गौतमी पाटील रात्री साडेआठच्या नंतर आल्यामुळे कार्यक्रम ९ वाजता सुरू झाला.

पालघर जिल्ह्यात गौतमी पहिल्यांदाच आली असल्याने तिच्या चाहत्यांची तुडुंब गर्दी झाली होती. रात्री १० च्या नंतर पोलिसांनी दोन वेळा कार्यक्रम बंद करण्याची विनंतीही केली होती; परंतु कार्यक्रम लांबत गेल्यामुळे ११ वाजेपर्यंत कार्यक्रम चालला. गौतमीचे नृत्य पाहण्यासाठी माजी खासदार बळीराम जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य काशिनाथ पाटील, माजी नगरसेवक सदानंद पाटील यांच्यासह अनेक लोकप्रतिनिधी यांनी हजेरी लावली होती.

> आम्ही अटी-शर्ती ठेवून गौतमीच्या कार्यक्रमाला परवानगी दिली होती. १० ची वेळ संपली असताना आम्ही कार्यक्रम बंद करत होतो, पण आमचे न ऐकता पुन्हा कार्यक्रम सुरू ठेवला. त्यामुळे अटी-शर्तींच्या नियमानुसार दिलेल्या परवानगीचा भंग केल्याप्रकरणी आयोजकांवर गुन्हा दाखल केला आहे.
> - **प्रफुल वाघ**, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, मांडवी पोलिस ठाणे

सामना पा. न. ६

# भाईंदरमध्ये उभे राहणार कांदळवन उद्यान

मीरा रोड, दि. २६ (सा.वा.) – मीरा-भाईंदर शहरात कांदळवन व जैवविविधता उद्यानासाठी जागा आरक्षित केलेली नव्हती. मात्र आता प्रशासनाला जाग आली असून यासंदर्भातील फेरबदल प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच उत्तनमध्ये सर्व्हे क्र. ३५२ मध्ये नऊ हेक्टर जागेवर कांदळवन व जैवविविधता उद्यानासाठी ३१ हेक्टर जागा आरक्षित केली आहे.

भाईंदर पश्चिमेच्या मौजे डोंगरी, उत्तन, तारोडी, चौक, पाली या गावांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विकास आराखडा तयार केला आहे. या आराखड्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महापालिकेला देण्यात आली आहे. या आराखड्यात जैवविविधता उद्यानासाठी व कांदळवन कक्ष पर्यायी जागेचे आरक्षण टाकलेले नव्हते. हे आरक्षण नसल्यामुळे महापालिकेला विकासकामे करताना मोठी अडचण निर्माण होत होती. त्यामुळे प्रशासनाने यासाठी उत्तनमध्ये जमिनीवर आरक्षण टाकले असून फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरीसाठी सरकारला सादर केला आहे. त्यामुळे विकास करताना तोडलेल्या कांदळवनांची पुन्हा लागवड करता येणार आहे. सध्या सुभाषचंद्र बोस मैदानाचा विकास, भाईंदर उत्तन रस्ता, जेसल पार्क, घोडबंदर रस्ता अशी अनेक विकासकामे प्रस्तावित आहेत. त्यासाठी काही ठिकाणी कांदळवन काढावे लागणार असल्याने महापालिकेला वनविभागाला पर्यायी जागा द्यावी लागणार आहे. त्यासाठी उत्तन येथील सुमारे ९९ हेक्टर सरकारी जागेपैकी ९ हेक्टर जागा हस्तांतरित केली जाणार आहे.

सामना पा. नं. ६

# धक्काबुक्की

नालासोपारा – वॉरंट घेऊन गेलेल्या पोलिसाला आरोपीने धक्काबुक्की केल्याची घटना वसईत घडली आहे. नायगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हिरालाल तडवी हे नालासोपारा येथे राहणाऱ्या आरोपी शशिकांत गुजराती याच्या नावे कुटुंब न्यायालय मध्य प्रदेश येथून आलेले वॉरंट बजावणीसाठी गेले होते. यावेळी आरोपीने त्यांना धक्काबुक्की केली. याबाबत नायगाव पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सामना पा. न. ६

# मोलकरणीने केली चोरी

वसई – वसई पूर्व गोखिवरे येथील अमन बंगलो येथे राहणाऱ्या मेकब्रेथ लोपीस यांच्या घरी घरकाम करणारी जया या महिलेने सहा तोळे वजनाचे १ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे ब्रेसलेट चोरी केले. याबाबत गुरुवारी वालीव पोलीस ठाण्यात आरोपी महिलेविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामना पा. न. ६

# घरफोडी

विरार – वसई पूर्व वालीव येथील देवयानी रेसिडेन्सी येथे राहणाऱ्या ज्योती पाटील यांच्या घरी अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करत दीड लाख रुपयांची रोख रक्कम लंपास केली. याबाबत वालीव पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner